फौ. कि. **अर्ज.क्र. २३२/२०२३**
शगुफता वि. मतीन
नि.क्र. ३२ पुढे सुरु

**<u>अर्जदारतर्फे विधीज्ञ श्री. एफ. पी. सयद यांचे मार्फत जाबदारतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास शपथेवर सुरु</u> :-**

**०९.** मी मागील ३ वर्षापासुन गॅरेजवर मेकॅनीक म्हणुन काम करतो. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झाले आहे. मी, आई आणि मोठा भाउ असे एकत्र राहतोत. लग्नापुर्वी मी पुणे येथे काम करत होतो. त्यावेळी मला ७,०००/- रू. पगार होता. हे म्हणणे खरे नाही की, आमचे लग्न पुणे येथे ठरले. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर नवरी मुलीस चार-पाच जुमागी पर्यंत घरीच ठेवले जाते. हे म्हणणे खरे नाही की, चार-पाच जुमागी झाल्यानंतर मी अर्जदारास घेवून पुणे येथे घेवून गेलो. अर्जदारास लग्नानंतर मी चार महिन्यानी पुणे येथे घेवून गेलो. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र.१ हिचे पहिल्या डिलीव्हरीचा खर्च तिच्या आई वडिलांनी केला. अर्जदार क्र.१ हिच्या पहिल्या डिलीव्हरीचा खर्च केल्याबाबत बिलाच्या पावत्या मी यापुर्वीच दाखल केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र.२ याचा जन्म झाल्यानंतर मी ३ दिवस त्याला पाहण्यास गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र.२ यास जन्मानंतर ३ दिवसांनी दवाखान्यात पाहण्यास गेल्यानंतर मी काहीएक खर्च न देता निघुन गेलो. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र.१ हिला घेवून जाण्यास न आल्याने ती स्वत:हुन माझेकडे आली.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पुण्याहुन परत आल्यानंतर मला गॅरेज सुरू करायचे होते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र. १ हिची गळसर दागिन्याचे विक्री करून मी सरकार ॲटोमोबाईल्स या नावाचे गॅरेज सुरू केले. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ ते २०२३ या कालावधीमध्ये अर्जदार क्र.१ हिला मारहाण करून ३ वेळा माहेरी पाठवून दिले. हे म्हणणे खरे आहे की, दरम्यानच्या काळात महिला मंडळ, सरपंच व पोलिस अधिकारी यांच्यामार्फत माझी समजुत काढण्यात आली त्यावेळी मी त्यांना अर्जदार क्र.१ हिला चांगले नांदवितो असे आश्वासन दिले होते.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, सन २०२३ पासुन अर्जदार क्र.१ तिच्या मुलांसह माहेरी राहते. साक्षीदार स्वत:हून पुढे सांगते की, अर्जदार क्र.१ ही सन २०२५ पासुन माहेरी राहते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची केस दाखल केल्यापासुन अर्जदार क्र.१ ही वेगळी राहते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र.१ वेगळी राहत

असल्यापासुन तिला मी काही खर्च पाणी दिले नाही.

**१२.** सन २०२३ मध्ये माझे वडिलांचे निधन झाले. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिलांचे अंत्यविधीला अर्जदार क्र.१ ही तिच्या भावासह मोटारसायकल वर आली होती. माझे वडिल शेती करत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिलांच्या नावे मौजे किनीनवरे येथील सर्वे नं.४४० क्षेत्र ०.४४ आर व सर्वे नं.४४८ क्षेत्र ०.१० आर जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, वडिलांच्या निधनानंतर माझी आई जमीनीची देखभाल करते आणि त्यातुन तिची उपजिवीका चालविते. माझा भाउ अमीन हा देखील शेती करतो. हे म्हणणे खरे नाही की, व्यवसाया करिता भाउ अमीन याला छोटा हत्ती ही गाडी घेवून दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर गाडीच्या उत्पन्नातुन येणारा नफा आम्ही दोघे वाटुन घेतो.

**१३.** मी दुचाकी मेकॅनीक आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिवसातुन मी ८ ते १० गाडयांचे काम करतो. साक्षीदार स्वत:हुन पुढे सांगतो की, मी २ ते ३ गाडयांचे काम रोज करतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे काम चांगले असल्यामुळे लोक माझेकडे नियमित गाडी दुरूस्ती करिता येतात. हे म्हणणे खरे नाही की, गाडी दुरूस्ती व्यवसायातुन मला दररोज २ ते ३ हजार रूपयांचे उत्पन्न मिळते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, दररोज माझे ६०० ते ७०० रूपयांचे उत्पन्न आहे.

**१४.** अर्जदार क्र.१ ही किराणा विक्रीचा व्यवसाय करते याबाबत कोणताही पुरावा दाखल केला नाही. मागील ७ ते ८ वर्षापासुन माझे बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा लामजना या बॅकेत खाते आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार क्र. १ हिला लग्नामध्ये २ तोळे सोने घातल्याबाबतचा पुरावा मी प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे आईला अस्थमा आजार असल्याचा कागदोपत्री पुरावा मी प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील कलम १ ते ८ मधील मजकुर खोटा आहे.

<u>**उलटतपास संपला.**</u>

<u>**फेरतपास नाही.**</u>

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.06.09 16:37:47 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि.०९.०६.२०२६

माझे समक्ष,

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.06.09 16:37:54 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि.०९.०६.२०२६